# मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## सायबर गुन्हे कक्ष

३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर –०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- २७१/२०२२ | दिनांक :- १२/०९/२०२२

## OLX वर जाहिरात टाकल्याने पैसे पाठविल्याचे QR Code Scanner पाठवून करण्यात आलेली फसवणूक रक्कम १,७३,८५९/- रुपये परत मिळवण्यात सायबर गुन्हे कक्षास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत वालीव पोलीस ठाणे हद्दीत राहणारे इसम शुभम श्रीवास्तव यांनी **OLX** वर त्यांची जुनी सायकल विक्रीकरीता जाहिरात टाकली होती. त्याकरीता त्यांना फोन येवून पैसे पाठविण्याकरीता **QR Code SCANNER** पाठवून प्रथम ०५ रुपये पाठविले व त्यांनतर त्यांचे बँक खात्यातून ०१,७३,८५९/- रुपये रक्कम दिनांक २७/०८/२०२२ रोजी कोणीतरी अज्ञात इसमाने काढून घेतलेबाबत सायबर गुन्हे कक्ष येथे चौकशीकरीता तक्रारी अर्ज प्राप्त झाला होता.

**(सायबर गुन्हे कक्ष आवक अर्ज क्रमांक १४२७-बी/२०२२ दिनांक २७/०८/२०२२ अन्वये चौकशीकामी प्राप्त झाला.)**

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत त्यांचे बँकेकडून माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीच्या आधारे **Flipkart,Eazypay, Paytm** या पेमेंट गेटवेद्वारे करण्यात आल्याचे दिसून आले. नमूद पेमेंट गेटवे कंपन्यासोबत पत्रव्यवहार व पाठपूरावा करुन नमूद फसवणूक रक्कम थांबविण्यात आली. तसेच फसवणूक रक्कम कोणत्याही न्यायालयीन प्रक्रीयेविना ०१,७३,५८९/- रुपये पुन्हा तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

### अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...







(Issued in Public Intrest – Cyber Cell,MBVV )

- **अनोळखी इसमाने पैसे पाठविण्याकरीता (received Money) QR Code SCANNER पाठविल्यास ते स्कॅन करू नका. ते QR Code SCANNER सायबर चोर/भामटे हे तुमच्या अकाऊंटमधून पैसे काढण्याकरीता करीत असतात.**
- **QR Code SCANNER चा उपयोग फक्त पैसे पाठविण्याकरीता होत असतो**

**मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे ओएलएक्स वर जाहिरात टाकून फसवणूक झाल्यास तात्काळ संबंधित बँकेला माहिती द्यावी, तसेच नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) अति.कार्य.पोलीस उप आयुक्त गुन्हे, श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोलीस अंमलदार /१२०९५ गणेश इलग, पोलीस अंमलदार/१२०९२ प्रविण आव्हाड, महीला पोलीस अंमलदार/ १३१०४ पल्लवी निकम, महिला पोलीस अंमलदार/१३०८७ अमिना पठाण, म.सु.ब. प्रशांत सिरामे यांनी पार पाडली आहे.

**----0000----**